**महत्वाचे पत्र**

जा.क्र./कृयाउअ/गुनि-५/मा.सू.२०१७-१८/226/२०१७
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१.
दिनांक : 13/०७/२०१७.

प्रति,

**१) विभागीय कृषि सहसंचालक, --------------------(सर्व))**
**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, ----------------(सर्व)**

**विषय-** सन २०१७-१८ मध्ये "उन्नत शेती - समृध्द शेतकरी" मोहिमेंतर्गत कृषि उन्नती योजनेंतर्गत कृषि यांत्रिकीकरण उपअभियानांच्या अंमलबजावणी करिता निर्गमीत **अंतरीम मार्गदर्शक सूचनांची स्थगिती उठविणेबाबत ...**

**संदर्भ** - १. कृषि आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सूचना जा.क्र./कृयाउअ/गुनि-५/मा.सू.२०१७-१८/१९४/२०१७, दि.१५/०६/२०१७
२. कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र./कृयाउअ/गुनि-५/मा.सू.२०१७-१८/१९६/२०१७, दि.१७/०६/२०१७
३. शासन निर्णय क्र. कृयाउ-१०१७/प्र.क्र.६४/१७/४ अे, दि. २१ जुन २०१७

सन २०१७-१८ मध्ये कृषि यांत्रिकीकरण उपअभियानांच्या अंमलबजावणी करिता कृषि आयुक्तालयाच्या संदर्भिय पत्र दि.१५/०६/२०१७ अन्वये अंतरीम मार्गदर्शक सूचना निर्गमीत करण्यात आल्या होत्या. सदर मार्गदर्शक सुचनांना संदर्भिय पत्र दि.१७/०६/२०१७ अन्वये तातपुरती स्थगिती देण्यात आली होती.

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय दि. २१ जुन २०१७ अन्वये कृषि यांत्रिकीकरण उपअभियान सन २०१७-१८ मध्ये राबविण्यासाठी केंद्र हिस्सा रु.३४१२.८० लाख व राज्य हिस्सा रु. २२७५.२० लाख अशा एकुण रु. ५६८८.०० लाख निधीच्या कार्यक्रमास प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे.

**कृषि यांत्रिकीकरण उपअभियानांच्या अंमलबजावणी करिता कृषि आयुक्तालयाच्या संदर्भिय पत्र दि.१५/०६/२०१७ अन्वये निर्गमीत अंतरीम मार्गदर्शक सूचनांची स्थगिती उठविण्यात येत आहे व सदर मार्गदर्शक सुचना अंतीम करण्यात येत आहे.** सन २०१७-१८ मध्ये कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाची अंमलबजावणी कृषि आयुक्तालयाच्या संदर्भिय पत्र दि.१५/०६/२०१७ अन्वये मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात यावी. दि.१५/०६/२०१७ अन्वये निर्गमीत मार्गदर्शक सुचना कृषि विभागाच्या http://krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

**(अशोक लोखंडे)**
**कृषि संचालक (नि. व गु. नि.)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत - माहीतीस्तव सादर -**
१. मा. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
२. श्री. सु. स. धपाटे, उपसचिव, कृषि- ४ अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.